सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

स्क्रीन रिडरचा बादशहा

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● मंगळवार, दिनांक १९ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# अखेर भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढल्याने

# शाळा व रुग्णालयाजवळील भटके कुत्रे हटविण्यावर सर्वोच्च न्यायालय ठाम!!

- निर्णयावर फेरविचार करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या
- देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांनी अत्यंत गंभीर वळण घेतल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले; प्रशासनावर ताशेरे
- कुत्र्यांचा धोका केवळ गल्ल्यांपुरता मर्यादित नाही, तर तो विमानतळ आणि निवासी संकुलांसारख्या अतिसंवेदनशील व गजबजलेल्या ठिकाणीही पोहोचला

## सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत कडक आणि महत्त्वपूर्ण भूमिका घेतली

**नवी दिल्ली : देशात भटक्या कुत्र्यांचा वाढता प्रादुर्भाव आणि त्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या घटना लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत कडक आणि महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. शाळा, रुग्णालये आणि इतर संवेदनशील सार्वजनिक ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचा आपला पूर्वीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे.**



**आधीच्या आदेशात कोणताही बदल नाही**

मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ७ नोव्हेंबरच्या आपल्या आधीच्या निर्णयात कोणताही बदल करण्यास स्पष्ट नकार दिला. या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत. यापूर्वीच्या आदेशानुसार, शाळा, रुग्णालये आणि इतर सार्वजनिक आस्थापनांच्या परिसरातून भटक्या कुत्र्यांना त्वरित हटवणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, या कुत्र्यांचे लसीकरण किंवा निर्बिजीकरण केल्यानंतरही त्यांना पुन्हा त्याच जागी म्हणजे शाळा किंवा रुग्णालयांच्या परिसरात सोडले जाणार नाही, हा नियम पुढेही लागू राहील असे न्यायालयाने ठामपणे स्पष्ट केले आहे.

### श्वानदंशाच्या धोक्याची व्याप्ती आणि प्रशासनावर ताशेरे

● देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांनी अत्यंत गंभीर वळण घेतल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. विविध बातम्या आणि अहवालांचा संदर्भ देत खंडपीठाने स्पष्ट केले की, श्वानदंशाचा आणि भटक्या कुत्र्यांचा धोका आता केवळ गल्ल्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो विमानतळ आणि निवासी संकुलांसारख्या अतिसंवेदनशील व गजबजलेल्या ठिकाणीही पोहोचला आहे. 'लाइव्ह लॉ'च्या वृत्ताचा हवाला देत न्यायालयाने सांगितले की, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक आणि अगदी परदेशी पर्यटकांवरही कुत्र्यांनी जीवघेणे हल्ले केल्याच्या 'अत्यंत विचलित करणाऱ्या' घटना समोर आल्या आहेत. संबंधित प्राधिकरणांच्या आणि प्रशासनाच्या दीर्घकालीन दुर्लक्षामुळेच ही समस्या आज इतक्या भयंकर आणि चिंताजनक पातळीवर पोहोचली असल्याचा संताप न्यायालयाने व्यक्त केला. याचबरोबर 'ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया'च्या (AWBI) प्रमाणित कार्यपद्धतीला आव्हान देणारे अर्जही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावले आहेत.



### राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी सर्वोच्च न्यायालयाचे नवे निर्देश

● भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना काही अत्यंत महत्त्वाचे आदेश दिले आहेत. या नव्या निर्देशांनुसार, देशातील सर्व राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी 'ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया'च्या (AWBI) नियमांचे सक्तीने व काटेकोर पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या नियंत्रणात आणण्याच्या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किमान एक 'प्राणी जन्म नियंत्रण केंद्र' लवकरात लवकर स्थापन करण्यात यावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

● यासोबतच, सर्व सरकारी रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांवर श्वानदंशावरील 'ॲंटी-रेबीज' लस आणि 'इम्युनोग्लोबुलिन'चा पुरेसा साठा नेहमी उपलब्ध राहील, याची खात्री करण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर सोपवण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण आदेशांची प्रशासकीय पातळीवर अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना न्यायालयाने विशेष कायदेशीर संरक्षण दिले असून, आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावताना या अधिकाऱ्यांवर विनाकारण कोणतेही पोलीस गुन्हे दाखल केले जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.





# 'गरीब नवाज'च्या चार मजली झोपड्यांवर बुलडोझर; वांद्रे स्टेशनबाहेर 1000 पोलीस तैनात

**मुंबई : प्रतिनिधी**

वांद्रे पूर्वेकडील स्टेशनबाहेरच्या गरीब नवाज झोपडपट्टीवर असलेल्या झोपड्यांवार आज तोडक कारवाई करण्यात आली. रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण करून या झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे या झोपड्या तीन मजली, चार मजली होत्या. काही दुमजली होत्या. म्हणजे या झोपड्या मिनी इमारतच होत्या. हे बांधकामही अनधिकृत होतं. त्यामुळे या सर्व झोपड्यांवर बुलडोझर फिरवण्यात आला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून 1000 पोलीस तैनात करण्यात आले होते.



वांद्रे पूर्व रेल्वे परिसरातील गरीब नगर भागात रेल्वे प्रशासनाने आज सकाळीच मोठी कारवाई सुरू केली. रेल्वेच्या जागेवर अनेक वर्षांपासून उभ्या असलेल्या बेकायदेशीर झोपड्यांवर बुलडोझरच्या साहाय्याने पाडकाम करण्यात आले. अजूनही हे पाडकाम सुरू आहे. अनेकदा सांगूनही इथले रहिवाशी जात नव्हते. अनेकदा नोटीसा बजावल्यानंतरही झोपड्या जैसे थे असल्याने आज अखेर या झोपड्यांवर बुलडोझर फिरवण्यात आला.

**सहा बुलडोझर**

रेल्वे परिसरात बेकायदेशीररित्या बांधण्यात आलेल्या झोपड्या हटवण्यासाठी 6 बुलडोझर आणण्यात आले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. नवीन रेल्वे मार्गांच्या विस्तारासाठी ही जमीन मोकळी करणे आवश्यक आहे. त्यामुळेच रेल्वेने ही कारवाई केली आहे. हा भाग मोकळा झाल्यावर त्या ठिकाणी नवीन रेल्वे मार्ग टाकण्याचं काम सुरू करण्यात येणार असल्याचंही सांगितलं जातं.

**कोर्टाच्या आदेशानेच**

कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून घटनास्थळी 1000 हून अधिक सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. RPF, GRP आणि मुंबई पोलिसांचा मोठा फौजफाटा परिसरात सज्ज ठेवण्यात आला होता. कारवाईदरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक परिसरातील दोन पूल बंद करण्यात आले होते. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी) विनीत अभिषेक यांनी यापूर्वी स्पष्ट केले होते की, "उच्च न्यायालयाच्या कडक आदेशानुसार अतिक्रमण हटवले जात आहे. रेल्वेला चालना देण्यासाठी नवीन मार्ग टाकणे गरजेचे असून त्यासाठी जमीन मोकळी करावी लागेल." सध्या पाडकाम सुरू असून, ही मोहीम लोकांच्या सहकार्याने राबवली जात असल्याचा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे.

**दोन दिवस पाडकाम**

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील गरीब नगरमध्ये रेल्वे स्थानकाच्या परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमण हटवण्यासाठी रेल्वे दोन दिवस ही मोहीम राबवणार आहे. रेल्वे आजपासून अनेक वर्षांपासून झालेले हे बेकायदेशीर अतिक्रमण हटवण्याचे काम सुरू केले आहे. रेल्वेच्या कारवाईपूर्वी येथे मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आज दिवसभरात 140 झोपड्या पाडण्यात येणार असल्याचं रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितलं. तर सकाळी रेल्वेच्या कारवाईपूर्वीच, बेकायदेशीरपणे बांधलेल्या या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी आपली घरे रिकामी केली होती.

**लोक भडकले**

दरम्यान, रेल्वेच्या कारवाईवर स्थानिक लोक भडकले आहेत. वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक परिसरातील गरीब नगरमधील रहिवाशांचे म्हणणे आहे की, आम्हाला कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही आणि १४० घरे पाडण्यात येणार आहेत. आम्हाला घराच्या बदल्यात दुसरे घर हवे आहे.

**म्हणे भारताला केले होते टार्गेट** ➤ पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी ज्या एअरबेसचा उल्लेख केला, ते मूळात भारतात अस्तित्वातच नाहीयत

# फेकूगिरीत पाकिस्तान सर्वात पुढे; फतह-1 मिसाइल संदर्भात माहिती निघाली खोटी

**नवी दिल्ली**

पाकिस्तान खोटी कामं करण्याच्या बाबतीत इतका पुढे आहे की त्यांच्या आसपास पण कुठला देश पोहोचू शकत नाही. महत्वाचं म्हणजे आपल्या या कारनाम्यांमध्ये त्यांनी देशातल्या मीडियाला देखील सहभागी करुन घेतलं आहे. आता पाकिस्तानने स्वत :हूनच सर्वांना खिल्ली उडवण्याचा विषय दिला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात मागच्यावर्षी चार दिवस सैन्य संघर्ष झाला. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांची हत्या केली म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केलं. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने ऑपरेशन बुनयान अल-मरसूसची घोषणा केली होती. भारतीय सैन्य दलाने या काळात ब्राह्मोस मिसाइलने अचूक हल्ला करुन पाकिस्तानी एअरफोर्सच्या धावपट्ट्या उखडून टाकल्या. सगळ्या जगाने हे दृश्य पाहिलं. पण पाकिस्तान अजूनही जे केलं नाही, त्याचे ढोल बडवत आहे. पाकिस्तानी सैन्याचे अधिकारी आपल्या जनतेला कसे मूर्ख बनवतात, त्याचं एक ताजं उदहारण समोर आलं आहे. नुकताच पाकिस्तानच्या जियो न्यूज चॅनलने ऑपरेशन बुनयान अल-मरसूसच्यावेळी फतह-1 मिसाइल डागणाऱ्या लॉन्च टीमचा इंटरव्यू केला.

आमच्या फतह-1 मिसाइलने भारतातील दोन सैन्य तळांना यशस्वीरित्या टार्गेट केलं असा दावा या पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी केला. पण या दाव्यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झालय. कारण या पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी ज्या एअरबेसचा उल्लेख केला, ते मूळात भारतात अस्तित्वातच नाहीयत.



फतह-1 मिसाइल लॉन्च टीमच्या सदस्यांची जियो न्यूज चॅनलने मुलाखत घेतली. अँकरने त्यांना थेट प्रश्न विचारला की, फतह-1 मिसाइलने आपलं टार्गेट उद्ध्वस्त केलं की नाही?. त्यावर कॅप्टन मुनीब जमाल यांनी निश्चितच असं उत्तर दिलं. आम्हाला दोन टार्गेट दिलेले. राजौरी एअरबेस आणि मामून एअरबेस. आम्ही दोन्ही टार्गेट्सवर यशस्वी हल्ला केला.

### पाकिस्तान खोटं बोलतो त्याचा हा घ्या पुरावा

● हा इंटरव्यू पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात पाहण्यात आला. मिसाइलने अचूकरित्या टार्गेटचा वेध घेतल्याच सांगण्यात आलं. पण सोशल मीडियावर ही बातमी येताच टार्गेट्सच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. भारतात राजौरी एअरबेस आणि मामून एअरबेस नावाचे इंडियन एअरफोर्सचे कुठले बेसच नाहीयत. त्यामुळे पाकिस्तानच्या या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होणं स्वाभाविक आहे. राजौरी जम्मू-काश्मीरमधला एक जिल्हा आहे. तिथे भारतीय सैन्याचे काही युनिट्स तैनात असतात. पण तिथे कुठलाही एअरफोर्सचा बेस नाहीय.

### भारतात एअरबेस कुठे आहेत?

मामून पठानकोटमध्ये एक सैन्य कॅंटोनमेंटचा भाग आहे. तिथे लष्कराच्या ब्रिगेड्स, युनिट्स असतात. पण तिथेही कुठला एअरबेस नाही. सोशल मिडिया आणि डिफेन्स एक्सपर्टस याला पाकिस्तानची फेकूगिरी म्हणत आहेत. भारतात पठानकोट, जम्मू, श्रीनगर, उधमपुर या ठिकाणी एअरबेस आहेत. पण पाकिस्तानी अधिकाऱ्यांना एकाही ठिकाणाचं योग्य नाव घेता आलेलं नाही. पाकिस्तानी मिडिया आणि सैन्याच्या विश्वसनीयतेवर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल .सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका,अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# गुरुवर्य प्रा. सुरेश पुरी : माणुसकीचा अथांग स्नेहसागर




विशेष
प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे
संवाद :9822836675




आपल्याला सभोवताली काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे अस्तित्व हे केवळ त्यांच्या कार्यापुरते मर्यादित राहत नाही ; तर ते विचारांची, संस्कारांची, प्रेरणेची आणि माणुसकीची एक अखंड परंपरा बनून पुढील अनेक पिढ्यांच्या जीवनाला दिशा देत राहते. अशी व्यक्तिमत्त्वे काळाच्या ओघात केवळ व्यक्ती राहत नाहीत, तर ती एक संस्कारपीठ बनतात. पत्रकारिता, जनसंवाद, शिक्षण, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थ्यांवरील निरपेक्ष प्रेम आणि माणुसकीच्या मूल्यांचा अथांग स्नेहसागर म्हणजे आदरणीय प्रा. सुरेश पुरी सर अर्थातच आपल्या सर्वांचे लाडके बाबा!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे माजी विभागप्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ अध्यापन करताना त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पत्रकारिता शिकवली नाही, तर जीवन समजून घेण्याची दृष्टी दिली. त्यांच्या वर्गात शिकवला जाणारा प्रत्येक विषय हा फक्त अभ्यासक्रमाचा भाग नसे ; तो वास्तव जीवनाशी जोडलेला असे. त्यांच्या शिकवणीतून विद्यार्थ्यांना संवेदनशीलता, सामाजिक जाणीव, विचारांची स्पष्टता आणि माणुसकीचा अर्थ समजत गेला.

आजच्या स्पर्धात्मक, यांत्रिक आणि मूल्यसंकटाच्या काळात प्रा. सुरेश पुरी यांच्यासारख्या शिक्षकांचे कार्य अधिक महत्त्वाचे वाटते. कारण त्यांनी पत्रकारितेला कधीच केवळ करिअर म्हणून पाहिले नाही. त्यांच्या मते पत्रकारिता म्हणजे समाजाशी असलेली नैतिक बांधिलकी. पत्रकार हा फक्त बातमी देणारा नसून समाजाच्या विवेकाचा प्रहरी असतो, ही भावना त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली .ते विद्यार्थ्यांना नेहमी सांगतात —

"पत्रकार होण्यापूर्वी चांगला माणूस बना."

या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण शिक्षणतत्त्वज्ञानाचा सार दडलेला आहे. ज्ञान, पदवी, करिअर, यश आणि प्रतिष्ठा यापेक्षा माणुसकी अधिक मोठी आहे, हा जीवनमंत्र त्यांनी आपल्या कृतीतून विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ व्यावसायिक यशासाठी तयार केले नाही, तर सामाजिक जबाबदारी स्वीकारणारे संवेदनशील नागरिक घडविले .आजही हे कार्य निरंतरपणे सुरू आहे.

प्रा. सुरेश पुरी यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. ते एक उत्कृष्ट शिक्षक, अभ्यासू पत्रकारिता तज्ज्ञ, प्रभावी वक्ते, साहित्यप्रेमी, हिंदी भाषेचे जाणकार तथा परीक्षामंत्री, हिंदी प्रचार सभा, हैदराबाद

, संवेदनशील विचारवंत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांवर निरपेक्ष प्रेम करणारे गुरुवर्य आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा आहे, पण तो सामान्य नाही ; त्यात सात्त्विकता आहे, पण ती दिखावूपणाची नाही ; त्यात माणुसकी आहे, पण ती केवळ शब्दांत नाही—ती त्यांच्या प्रत्येक कृतीत आहे.

त्यांनी आयुष्यभर ज्ञानदानाची साधना केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना योग्य दिशा दाखवणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. त्यांच्या शिकवणीत पुस्तकांचा गंध होता ; पण त्याचबरोबर जीवनाच्या वास्तवाचा स्पर्शही होता. म्हणूनच त्यांच्या वर्गातून बाहेर पडलेले विद्यार्थी केवळ पत्रकार झाले नाहीत, तर विचारशील आणि सामाजिक जाणीव असलेले माणूस बनले.

विद्यार्थ्यांशी त्यांचे नाते हे केवळ शिक्षक–विद्यार्थी इतकेच मर्यादित नव्हे तर ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, सल्लागार, मानसिक आधार आणि अनेक वेळा पालकही बनले. अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंगात त्यांनी खंबीरपणे साथ दिली .आजही माझ्या सारख्या कला , साहित्य , संस्कृतीच्या उपासकाला मायेची उब देत असतात. कोणाच्या शिक्षणाची अडचण असो, कोणाच्या करिअरचा प्रश्न असो किंवा वैयक्तिक संकट असो—पुरी सर विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत.

अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला त्यांच्या एका शब्दाने दिशा मिळाली. त्यांच्या एका कौतुकाने आत्मविश्वास वाढला. त्यांच्या एका मार्गदर्शनाने करिअर घडले. म्हणूनच आज देश–विदेशात विविध क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक विद्यार्थी अभिमानाने सांगतात —

"आज आम्ही जे काही आहोत, ते आदरणीय पुरी सरांमुळेच."

एखाद्या शिक्षकाची खरी कमाई ही त्याने कमावलेली संपत्ती नसते ; तर त्याने घडविलेली माणसे असतात. प्रा. सुरेश पुरी यांनी अशी असंख्य माणसे घडविली, जी आज पत्रकारितेसह विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत आणि समाजसेवेत योगदान देत आहेत.

प्रा. सुरेश पुरी यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची निरपेक्षता. त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. त्यांनी पद, पैसा किंवा सन्मान यामागे धाव घेतली नाही. विद्यार्थ्यांचे यश हीच त्यांची खरी कमाई होती. ज्ञानाचा, अनुभवाचा किंवा पदाचा किंचितही अहंकार त्यांच्या वागण्यात कधी दिसला नाही. अत्यंत साधेपणाने, पारदर्शकतेने आणि सच्चेपणाने ते आयुष्य जगत आहेत.

त्यांच्या सहचारिणी विजयमाला पुरी सर्वांच्या लाडक्या ( काकू )यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांवर मायेची पखरण करणाऱ्या काकूंनी अनेक विद्यार्थ्यांना आपल्या लेकरांप्रमाणे जपले. प्रा .पुरी सरांचे घर हे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच प्रेम, आधार आणि आत्मीयतेचे ठिकाण राहिले. विद्यार्थ्यांना घरच्यासारखी ऊब देणारे हे दांपत्य अनेकांसाठी प्रेरणेचे केंद्र आहे.

पत्रकारिता आणि जनसंवाद क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी पत्रकारितेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. सत्य, नैतिकता, सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि भाषेची जबाबदारी या मूल्यांचे संस्कार त्यांनी विद्यार्थ्यांवर केले. "समाजाच्या वेदनांना शब्द द्या," हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात कायमचा कोरला गेला आहे.

आज माध्यमविश्वात वेग, स्पर्धा आणि बाजारपेठेचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत मूल्यनिष्ठ पत्रकारितेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. प्रा. सुरेश पुरी यांनी विद्यार्थ्यांना शिकवलेली पत्रकारिता ही माणसाशी जोडलेली पत्रकारिता आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना बातमीमागील वास्तव समजून घेण्याची दृष्टी दिली. गरीब, वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या प्रश्नांना आवाज देण्याचे धैर्य दिले.

त्यांच्या मते पत्रकारितेचे खरे सामर्थ्य हे सत्तेला प्रश्न विचारण्यात आणि समाजाच्या दु:खाला अभिव्यक्त करण्यात आहे. पत्रकाराने निर्भय, प्रामाणिक आणि संवेदनशील असले पाहिजे, हा संदेश त्यांनी सातत्याने दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे, हे समजावून सांगितले.

त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून "प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिप" ही योजना सुरु करण्यात आली, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' या राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संघटनेच्या वतीने पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. बारामती येथे आयोजित कार्यशाळेत या स्कॉलरशिपचा शुभारंभ करण्यात आला.

ही योजना केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नाही. ती पत्रकारितेतील मूल्यसंस्कारांचा सामाजिक संकल्प आहे. आर्थिक अडचणींमुळे शिक्षण घेऊ न शकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही योजना आशेचा दीपस्तंभ ठरणार आहे. व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने तीन लाख रुपयांची ही स्कॉलरशिप उपलब्ध करून देण्यात येणार असून, निवड प्रक्रियेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे.

ही स्कॉलरशिप म्हणजे प्रा. सुरेश पुरी यांच्या जीवनतत्वज्ञानाचे सामाजिक रूप आहे. त्यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांना उभे केले ; आता त्यांच्या नावाने सुरू झालेली योजना अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणार आहे. शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालून समाजाला सक्षम पत्रकार देण्याचे हे कार्य पुढील काळात अधिक व्यापक होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ समाजकार्य महाविद्यालयाच्या "स्मृती संगम–२०२४" अंतर्गत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. हा सन्मान म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या निष्ठावान कार्याची समाजाने घेतलेली दखल आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी आज देशभर विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजसेवा करीत आहेत. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

१९ मे हा त्यांचा जन्मोत्सव म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी असलेला आदर हा शब्दांच्या पलीकडचा आहे. अनेक विद्यार्थ्यांसाठी ते केवळ शिक्षक नाहीत ; ते जीवनाचे सारथी आहेत.

"काही माणसं असतात
पिंपळाच्या पानासारखी,
कायमच हृदयाच्या
पुस्तकात राहण्यासारखी"

या ओळी जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीच लिहिल्या गेल्या आहेत.

आजच्या काळात शिक्षकांची भूमिका केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरती मर्यादित होत चालली असताना, प्रा. सुरेश पुरी यांनी शिक्षणाला माणूस घडविण्याचे माध्यम बनवले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान दिले नाही, तर संस्कारांची बीजे पेरली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वत:साठी नव्हे, तर समाजासाठी जगण्याची प्रेरणा दिली.

त्यांचे कार्य एका लेखात, एका पुस्तकात किंवा एका सन्मानात मावणारे नाही. ते अनेक पिढ्यांच्या स्मरणात जिवंत राहणारे संस्कारविश्व आहे. त्यांनी घडविलेली माणसे हीच त्यांची खरी संपत्ती आहे. त्यांच्या सहवासातून हजारो विद्यार्थ्यांना जीवनाचा अर्थ समजला, संघर्ष करण्याची ताकद मिळाली आणि समाजाशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा मिळाली.

आजही तीच ऊर्जा कायम आहे. अशा या माणुसकीच्या अथांग स्नेहसागर गुरुवर्यांना स्वास्थ्यपूर्ण, निरामय आणि आनंददायी जीवन लाभो .त्यांच्या जीवनकार्याचा प्रकाश पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहो, हीच जन्मोत्सव निमित्ताने सम्यक मंगलकामना!

# मोबाईलचा अति वापर, सायबर फसवणूक आणि तरुणाईसमोरील वाढता डिजिटल धोका




विशेष
संदीपान महादेव सोनवणे
सपोनि





आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. शिक्षण, बँकिंग, सोशल मीडिया, मनोरंजन, ऑनलाइन व्यवहार, सरकारी सेवा यामुळे मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र मोबाईलचा अति वापर आणि डिजिटल जगातील निष्काळजीपणा यामुळे सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, मानसिक छळ आणि समाजविघातक कारवायांमध्येही वाढ होत आहे. विशेषत: तरुण पिढी यामध्ये सर्वाधिक अडकताना दिसत आहे.

आज सायबर गुन्हेगार फेक लिंक, बनावट कॉल, QR कोड, सोशल मीडिया हॅकिंग, फेक लोन ॲप्स, डिजिटल अरेस्ट, तसेंच ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून नागरिकांना जाळ्यात ओढत आहेत. "KYC अपडेट करा", "बँक खाते बंद होणार", "लॉटरी लागली", "पोलीस किंवा CBI बोलत आहेत" अशा प्रकारचे मेसेज आणि कॉल करून लोकांना घाबरवले जाते. अनेक वेळा OTP, UPI PIN किंवा बँक माहिती मिळवत काही मिनिटांत खात्यातील रक्कम काढून घेतली जाते. यासोबतच सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अधिक गंभीर बनत आहे.

मोबाईलमधील फोटो, व्हिडिओ आणि वैयक्तिक माहिती चोरी करून ब्लॅकमेलिंग आणि एक्सटॉर्शन केले जात आहे. काही गुन्हेगार फोटो एडिट करून अश्लील स्वरूपात तयार करतात आणि ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देतात. काही वेळा संबंधित व्यक्तीच्या मोबाईल किंवा सोशल मीडिया खात्यातून त्यांच्या नातेवाईकांना, मित्रांना किंवा सहकाऱ्यांना घाणेरडे, अश्लील आणि बदनामीकारक मेसेज पाठवले जातात. त्यामुळे पीडित व्यक्तीला मानसिक तणाव, सामाजिक बदनामी आणि नैराश्याला सामोरे जावे लागते.

विशेष म्हणजे सोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर काही समाजविघातक आणि देशविरोधी कारवायांसाठीही होत असल्याचे समोर येत आहे. काही दहशतवादी संघटना आणि देशहितविरोधी गट सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांचे ब्रेनवॉश करण्याचा प्रयत्न करतात. चुकीची माहिती, द्वेषपूर्ण प्रचार, अफवा आणि भडकावू संदेश पसरवून समाजात अस्थिरता निर्माण केली जाते. ऑनलाइन गेमिंग, गुप्त चॅट गट आणि फेक प्रोफाइलच्या माध्यमातून तरुणांना चुकीच्या मार्गाला लावण्याचे प्रकारही वाढताना दिसत आहेत. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा वापर करताना राष्ट्रीय सुरक्षा आणि सामाजिक जबाबदारी यांचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

मोबाईलच्या अतिवापराचा सर्वाधिक परिणाम तरुणांच्या करिअर आणि मानसिक आरोग्यावर होत आहे. अनेक युवक–युवती तासन् तास सोशल मीडिया, रील्स, ऑनलाइन गेमिंग आणि निरर्थक चॅटिंगमध्ये वेळ घालवत आहेत. अभ्यास, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि कुटुंबासाठी वेळ कमी होत चालला आहे. झोपेचे विकार, चिडचिड, नैराश्य, एकाग्रतेचा अभाव आणि आत्मविश्वास कमी होणे यासारखे परिणाम दिसून येत आहेत.

मोबाईलचे व्यसन तरुणाईला वास्तव जीवनापासून दूर नेत असून त्याचा थेट परिणाम करिअर, नोकरी आणि भविष्यातील प्रगतीवर होत आहे.

सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी प्रत्येक नागरिकाने डिजिटल सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. OTP, PIN, पासवर्ड किंवा बँक माहिती कोणालाही सांगू नये. अनोळखी लिंक, QR कोड किंवा संशयास्पद कॉलवर विश्वास ठेवू नये. मोबाईलमध्ये मजबूत पासवर्ड आणि दोन टप्प्यांची सुरक्षा प्रणाली वापरावी. फक्त अधिकृत ॲप्सच डाउनलोड करावीत. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती मर्यादित ठेवावी. पालकांनी मुलांच्या मोबाईल वापरावर लक्ष ठेवून त्यांना सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन मिळेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आर्थिक फसवणूक झाल्यास त्वरित बँकेशी संपर्क साधून खाते सुरक्षित करावे, राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन 1930 वर तक्रार नोंदवावी तसेच सायबर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करावा.

आज मोबाईल आणि इंटरनेट हे गरजेचे साधन असले तरी त्याचा योग्य आणि मर्यादित वापर करणे ही काळाची गरज आहे. मोबाईलचे फायदे जितके मोठे आहेत तितकेच त्याचे तोटेही गंभीर आहेत. त्यामुळे तरुणांनी वेळेचे महत्त्व ओळखून मोबाईलचा वापर ज्ञान, शिक्षण आणि प्रगतीसाठी करणे आवश्यक आहे.

"डिजिटल जगात सतर्कता, संयम आणि सामाजिक जबाबदारी हीच सुरक्षित भविष्याची खरी गुरुकिल्ली आहे."

# तीन सख्खी भावंडे जीवाला जीव देणारे तिघांचाही एकाच ठिकाणी बुडून मृत्यू

नाशिक : उन्हाळ्यात तापमानाचा पारा 45 अंशांच्या वर गेला असल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. उष्णतेपासून आराम मिळावा यासाठी राज्याच्या विविध भागात अनेकजण पोहण्याचा आनंद लुटतात. अशातच आता पाण्यात बुडून 3 वेगवेगळ्या घटनांमध्ये 6 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. अमरावतीत 3, नाशिकमध्ये 2 तर अहिल्यानगर जिल्ह्यात एकाचा बुडून मृत्यू झाला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

अमरावतीच्या वरुड तालुक्यातील पुसली धरणात बुडून तीन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला आहे. मनोहर निमकर यांच्या शेतातील झोपडीत राहणाऱ्या संतुलाल उईके यांच्या पंकज संतुलाल उईके ( वय 10 ) प्रिया संतुलाल उईके ( वय 8 ) पवन संतुलाल उईके ( वय 7 ) यांचा मृत्यू झाला आहे. ही तीनही मुले नरखेड येथील आश्रम शाळेत शिकतात. ही मुले धरणात आंघोळीला किंवा मच्छी मारण्यासाठी गेल्याचा अंदाज आहे, मात्र या तिघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.



नाशिकच्या सुरगाणा तालुक्यातील बोरगाव जवळील चिखली येथे हौदात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. दर्शन जगदीश भोये ( वय 4 ) तन्मय निलेश भोये ( वय 3 ) दोघेही भाऊ हे सकाळी दहा वाजेच्या सुमारास घराजवळ खेळत असतांना जवळच घर बांधकामासाठी खोदलेल्या पाणी साठवण खड्यात पडल्याने दोन्ही बालकांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे .दोन्ही मुले खड्यात पडल्याचे घरच्यांच्या लक्षात येताच एकच खळबळ उडाली. पाण्यातून काढून त्यांना तात्काळ उपचारासाठी बोरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता प्राथमिक अहवालानुसार वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. शवच्छेदनासाठी दोन्ही मुलांना सुरगाणा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. शवच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरावर शोककळी पसरली आहे.

विशेष

## ग्राहक पंचायत कन्नड तालुका अध्यक्षपदी रूपेश भारुका; शहराध्यक्षपदी स्वप्नील उपासनी



कन्नड / प्रतिनिधी :
अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या कन्नड तालुका अध्यक्षपदी रूपेश भारुका, तर कन्नड शहर अध्यक्षपदी स्वप्नील उपासनी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड ११ मे २०२६ रोजी आयोजित ऑनलाइन बैठकीत जाहीर करण्यात आली. बैठकीत ग्राहक जनजागृती, ग्राहक हक्क संरक्षण व सामाजिक उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. जिल्हाध्यक्ष धनकुमार मंडलेवा यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली.
तालुका कार्यकारिणीत दिलीप पवार, सागर पाटील (उपाध्यक्ष), सुनील जैन (सचिव), रामचंद्र लालवानी (सह सचिव) आदींचा समावेश आहे. शहर कार्यकारिणीत नंदकुमार भोजवळ, सहयोग जव्हाळे (उपाध्यक्ष), केदार जवळकर (सचिव) आदींची निवड करण्यात आली.
या बैठकीस प्रांत संघटक रामदास तोटे, धनंजय मुळे, नागेश गवते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून, ग्राहक हितासाठी प्रभावी काम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## मुंबईकरांच्या खिशाला आणखी एक कात्री; ब्रेडच्या दरात तब्बल ५ रुपयांची वाढ!

मुंबई : मुंबईकरांच्या खिशाला आता आणखी एक मोठी कात्री लागली आहे. आधीच दूध आणि पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे हैराण झालेल्या सर्वसामान्यांना आता रोजच्या नाश्त्यासाठीही जादा पैसे मोजावे लागणार आहेत. मुंबई आणि आसपासच्या परिसरात ब्रेडच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, यामुळे घरगुती बजेट पूर्णपणे कोलमडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. 'मॉडर्न ब्रेड' या प्रख्यात कंपनीने आपल्या बहुतांश लोकप्रिय उत्पादनांच्या दरात तब्बल ५ रुपयांपर्यंत वाढ केली आहे. सध्याच्या वाढत्या उत्पादन खर्चामुळे 'ब्रिटानिया' आणि 'विब्स' यांसारख्या इतर आघाडीच्या ब्रेड उत्पादक कंपन्याही येत्या काही दिवसांत दरवाढ करण्याची दाट शक्यता असल्याचे उद्योग क्षेत्रातील सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

अचानक दरवाढ का झाली?

ब्रेडच्या या अचानक झालेल्या दरवाढीमागे प्रामुख्याने अनेक घटक कारणीभूत असल्याचे बाजारातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. यातील सर्वात मोठे कारण म्हणजे ब्रेड पॅकेजिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या कच्च्या मालाचे वाढलेले दर. भारत मोठ्या प्रमाणावर पॅकेजिंग-ग्रेड प्लास्टिकची आयात करतो, परंतु डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया कमकुवत झाल्यामुळे ही आयात उत्पादकांना खूप महाग पडत आहे. याशिवाय, पेट्रोल आणि डिझेलच्या गगनाला भिडलेल्या किमतींमुळे कंपन्यांचा वाहतूक आणि वितरण खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच, ब्रेडच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेले मीठ, प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि इतर कच्च्या मालाच्या किमतीही गेल्या काही आठवड्यांत वाढल्याने उत्पादक कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण आला आहे, ज्याचा थेट परिणाम आता दरवाढीच्या ● पान ४ वर...

# इंधन टंचाईचा भडका! कन्नडमध्ये पेट्रोल पंपावर तुफान गर्दी, धक्काबुक्कीपर्यंत परिस्थिती





➤ कन्नड / प्रतिनिधी :
कन्नड शहरात आज अचानक इंधन टंचाईची भीती निर्माण झाल्याने पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची तुडुंब गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. पेट्रोल व डिझेलचा अतिरिक्त साठा करून ठेवण्याच्या उद्देशाने नागरिक मोठमोठ्या डब्यांमध्ये इंधन भरून घेत असल्याचे दिसून आले.
मागील काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विधानानंतर देशभरात निर्माण झालेल्या चर्चेचा परिणाम कन्नड तालुक्यावरही झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.
सकाळपासूनच शहरातील बहुतांश पेट्रोल पंपांवर मोठ्या रांगा
वाहनधारकांकडून अतिरिक्त साठा करण्याचा प्रयत्न
काही ठिकाणी पेट्रोल-डिझेल लवकर संपल्याची माहिती
कर्मचाऱ्यांवर वाढलेला ताण, व्यवस्थापन कोलमडले

### धक्काबुक्की आणि पोलिसांची हस्तक्षेप :

गर्दी अनियंत्रित झाल्याने काही पेट्रोल पंपांवर किरकोळ धक्काबुक्कीचे प्रकार घडले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलीस प्रशासनाला हस्तक्षेप करून शांतता प्रस्थापित करावी लागली.

### संशयास्पद साठेबाजी? :

काही बेलगाम व्यापाऱ्यांकडून इंधनाचा अतिरिक्त साठा



केला जात असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे सामान्य नागरिकांना इंधन मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची चर्चा सुरू आहे.

### प्रशासनाकडून अस्पष्टता :

● शासनाच्या नियमावलीबाबत कोणतीही स्पष्ट माहिती नाही ● स्थानिक पुरवठा विभागाकडूनही साठ्याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ ● नागरिकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण सध्याची परिस्थिती पाहता प्रशासनाने तातडीने स्पष्ट भूमिका घेत नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. अन्यथा अफवा आणि भीतीमुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# भाविकांची वाढती गर्दी; अधिक मासानिमित्त पुरुषोत्तम पुरी मार्गावर जादा बसेस सोडण्याची मागणी

➤ अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे प्रवाशांची गैरसोय

➤ माजलगाव : प्रतिनिधी
अधिक मासानिमित्त देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान ठरलेल्या पुरुषोत्तम पुरी येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी होत असून, माजलगाव आगाराकडून पुरेशा बसफेऱ्या उपलब्ध होत नसल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.
देशातील भगवान पुरुषोत्तमाचे एकमेव मंदिर पुरुषोत्तम पुरी येथे असल्यामुळे महाराष्ट्रासह विविध राज्यांमधून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत आहेत. अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर दिवसेंदिवस वाढणारी गर्दी लक्षात घेता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढला



आहे. मात्र, प्रवाशांच्या तुलनेत बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याने भाविकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.
विशेषत: सकाळच्या वेळेत दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या अधिक असते. त्यामुळे सकाळी सहा वाजताच्या बसफेऱ्या नियमित आणि वेळेवर सुरू कराव्यात, तसेच अतिरिक्त बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाविक व नागरिकांनी केली आहे.
बसस्थानक परिसरात महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी होत असून, अनेकांना उभ्याने प्रवास करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.
बसफेऱ्या अपुऱ्या असल्याने काही खासगी वाहनधारकांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्याही तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे भाविकांची आर्थिक लूट होत असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.
दरम्यान, भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी माजलगाव आगार प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुरुषोत्तम पुरी मार्गावर तातडीने जादा बसेस सोडाव्यात, तसेच बसस्थानक परिसरात आवश्यक सुविधा आणि योग्य नियोजन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिक व भाविकांकडून करण्यात येत आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- अधिक मासामुळे पुरुषोत्तम पुरी येथे भाविकांची मोठी गर्दी
- माजलगाव आगाराकडून बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याची तक्रार
- सकाळच्या वेळेत अतिरिक्त बसेस सुरू करण्याची मागणी
- महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांची गैरसोय
- खासगी वाहनधारकांकडून जादा भाडे आकारल्याच्या तक्रारी
- सकाळपासून रात्रीपर्यंत नियमित बससेवा सुरू करण्याची अपेक्षा

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| कु | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

## विशेष



### महिलेचा विनयभंग व जीवघेणा हल्ला प्रकरणी आरोपीस ५ वर्षांची शिक्षा

कन्नड / प्रतिनिधी : जुन्या प्रेम प्रकरणाच्या वादातून २१ वर्षीय महिलेचा विनयभंग करून हातोडीने जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी ५ वर्षे सश्रम कारावास व २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

ही घटना १६ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी कन्नड शहरातील हिवरखेडा रोड परिसरात घडली होती. आरोपी राकेश ऊर्फ प्रशांत मोरे याने महिलेस जबरदस्तीने ओढून नेत विनयभंग करत हातोडीने डोक्यावर व हातावर वार करून गंभीर जखमी केले होते.

या प्रकरणी कन्नड शहर पोलीस ठाण्यात भादवी कलम ३०७, ३५४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सरकारी अभियोक्ता आर. एस. पहाडिया यांनी प्रभावी बाजू मांडली. न्यायाधीश एस. एस. गोरवाडे यांनी १८ मे रोजी निकाल देत आरोपीस दोषी ठरवले.

### रशियाकडून चिनी मालवाहू जहाजावर हल्ल्याचा युक्रेनचा दावा; आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ



जगभरात खळबळ उडवणारी एक मोठी घटना समोर आली आहे. युक्रेनने गंभीर आरोप करत दावा केला आहे की, रशियन ड्रोन हल्ल्यात चिनी मालकीच्या जहाजालाही लक्ष्य करण्यात आले आहे. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली असून रशिया आणि चीनच्या संबंधांवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

विशेष म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन (Vladimir Putin) लवकरच चीन दौऱ्यावर जाणार असल्याची चर्चा असताना हा कथित हल्ला झाल्याने अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.

माध्यमांच्या वृत्तानुसार, काळ्या समुद्र परिसरात रशियन ड्रोन हल्ल्यादरम्यान दोन नागरी जहाजांना लक्ष्य करण्यात आले. युक्रेनच्या बंदर प्रशासनाने सांगितले की, या जहाजांपैकी एक मार्शल आयलंड्सच्या ध्वजाखाली कार्यरत होते, तर दुसरे गिनी-बिसाऊच्या ध्वजाखाली होते. दोन्ही जहाजे ओडेसा बंदराच्या दिशेने जात होती.

युक्रेनियन नौदलाने दावा केला की, चिनी मालकीचे 'केएसएल देयांग (KSL Deyang)' हे मालवाहू जहाजही या हल्ल्यात नुकसानग्रस्त झाले. जहाजावर चिनी कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. युक्रेनियन अधिकाऱ्यांनी जहाजाच्या नुकसानीचे काही फोटोही प्रसिद्ध केल्याचा दावा केला जात आहे.

दरम्यान, पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आधीच जागतिक समुद्री मार्गांवर संकट निर्माण झाले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात जहाजांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होत आहे. अशातच आता काळ्या समुद्रात घडलेल्या या घटनेने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे.

ओडेसा हे युक्रेनसाठी अत्यंत महत्त्वाचे सागरी आणि व्यापारी केंद्र मानले जाते. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध सुरू झाल्यापासून या भागात सातत्याने हल्ले होत आहेत. मात्र, चिनी मालकीच्या जहाजाचे नाव समोर आल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या दाव्यांवर अद्याप रशियाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तसेच चीननेही या घटनेवर मौन बाळगले आहे. त्यामुळे या प्रकरणाचे नेमके स्वरूप काय, याकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागले आहे.

### मुंबईकरांच्या खिशाला आणखी एक कात्री; ब्रेडच्या दरात तब्बल ५ रुपयांची वाढ!

● पान ३ वरून... रूपात समोर आला आहे.

नवे दर आणि बेकरी चालकांच्या अडचणी

मुंबईतील लोखंडवाला कॉम्प्लेक्स आणि इतर भागांतील किरकोळ विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजारात अनेक उत्पादनांवर नवीन सुधारित दर आधीच लागू झाले आहेत. या नव्या दरानुसार, ४०० ग्रॅम सँडविच ब्रेडच्या पाकिटाची किंमत आता ४० रुपयांवरून ४५ रुपये झाली आहे, तर गव्हाचा ब्रेड (होल व्हीट ब्रेड) ५५ रुपयांवरून ६० रुपयांवर पोहोचला आहे. त्याचप्रमाणे मल्टीग्रेन ब्रेड आता ६० रुपयांऐवजी ६५ रुपयांना विकला जात असून, ब्राऊन ब्रेडच्या किमतीही ४५ रुपयांवरून ५० रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. मोठ्या ब्रेडसोबतच छोट्या ब्रेडचे दरही वधारले आहेत; छोटा व्हाईट ब्रेड २० रुपयांवरून २२ रुपयांवर आणि छोटा ब्राऊन ब्रेड २८ रुपयांवरून ३० रुपयांवर गेला आहे. केवळ मोठ्या कंपन्याच नव्हे, तर स्थानिक बेकरी चालकांनाही पॅकेजिंग, इंधन आणि लॉजिस्टिकचा हा वाढता खर्च पेलणे कठीण जात असल्याने जुन्या दराने ब्रेडची विक्री करणे त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे बेकरी असोसिएशनच्या सदस्यांनी सांगितले आहे.

सर्वसामान्यांवर परिणाम

पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या आहेत आणि या जागतिक घडामोडींचा थेट परिणाम भारतातील महागाईवर होत आहे. इंधन दरवाढीचा फटका विविध क्षेत्रांतील वाहतुकीला बसल्याने मुंबईतील अनेक दैनंदिन वापराच्या वस्तू महागल्या आहेत. आता दूध आणि ब्रेडसारख्या रोजच्या गरजेच्या आणि नाश्त्याच्या वस्तूही महागल्यामुळे मध्यमवर्गीय आणि अल्प-उत्पन्न असलेल्या कुटुंबांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. 'अत्यावश्यक वस्तूंच्या किमती अशाच सातत्याने वाढत राहिल्यास सर्वसामान्यांनी घरखर्च कसा चालवायचा?', असा संतप्त सवाल आता ग्राहकांमधून विचारला जात आहे.

# शेतात पिके तेजीत, घरात येताच दर कोसळतात; माल विकताच भाव गगनाला

## बाजारातील चढ-उतारामुळे शेतकरी आर्थिक संकटात; हमीभावाच्या मागणीला जोर





➤ बीड / विशेष प्रतिनिधी : शेतकऱ्यांनी वर्षभर कष्ट करून पिकवलेला शेतमाल बाजारात विक्रीसाठी नेताच त्याचे दर घसरतात, मात्र तोच माल व्यापाऱ्यांकडे गेल्यानंतर काही दिवसांतच भाव गगनाला भिडतात, अशी संतप्त भावना जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक संकटे आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे शेतकरी दिवसेंदिवस आर्थिक विवंचनेत सापडत असून, शासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

यंदाच्या हंगामात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि वातावरणातील बदलांचा सामना करत शेतकऱ्यांनी मूग, उडीद, सोयाबीन, कापूस, ज्वारी, गहू, बाजरी आणि हरभरा ही पिके जोपासली. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा खर्च आणि कर्जफेड यासाठी काही पैसे हातात पडतील, या अपेक्षेने शेतकरी रात्रंदिवस शेतात राबत होता. मात्र, उत्पादन बाजारात नेताच व्यापाऱ्यांकडून "माल भिजलेला आहे", "दाणा काळसर आहे" अशी विविध कारणे सांगत कवडीमोल भावात खरेदी करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांच्या घरातून सोयाबीन आणि कापूस पूर्णतः बाहेर गेल्यानंतर आता त्या पिकांच्या दरात मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सोयाबीनचे दर आठ हजार रुपयांच्या आसपास तर कापसाचे दर दहा हजार रुपयांच्या जवळ पोहोचल्याचे सांगितले जात आहे. मात्र, शेतकऱ्यांकडे माल असताना हेच दर अत्यंत कमी होते. त्यामुळे बाजारातील दरनियंत्रण आणि व्यापाऱ्यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, बाजरी आणि हरभरा पिकांची परिस्थितीही वेगळी नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. काही महिन्यांपूर्वी चांगला दर असलेल्या गव्हाचे भाव अचानक घसरले असून, ज्वारी आणि बाजरीलाही अपेक्षित बाजारभाव मिळत नाही. दुसरीकडे खत, बियाणे, औषधे, मजुरी आणि सिंचनाचा खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतीचे गणित कोलमडले आहे.

### संकट नेहमी शेतकऱ्यांच्या पिकांभोवतीच का फिरते?

● - गणेश लुचारे (शेतकरी, कुक्कडगाव) यांनी प्रश्न उपस्थित करत सांगितले, "भाव गडगडण्याचे संकट नेहमी शेतकऱ्यांच्या पिकांभोवतीच का फिरते? इतर वस्तूंचे दर कोसळल्याचे कधी ऐकिवात नाही."

● शेतकऱ्यांचा माल विकताच बाजारभाव वाढत असल्याची तक्रार

● सोयाबीन, कापूस, ज्वारी, गहू, बाजरीच्या दरात मोठी चढ-उतार

● उत्पादन खर्च वाढला; मात्र हमीभाव अपुरा ● व्यापाऱ्यांकडून कवडीमोल दरात खरेदी केल्याचा आरोप ● वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी मानसिक तणावाखाली ● शासनाने ठोस हमीभाव धोरण राबवण्याची मागणी

### व्यापारी आणि राज्यकर्त्यांचे संगनमत — भारत बडे



सामाजिक कार्यकर्ते भारत बडे यांनी बाजारातील परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, "शेतकऱ्यांचा माल बाजारात आला की दर कोसळतात आणि माल व्यापाऱ्यांकडे गेल्यावरच भाव वाढतात. यामागे व्यापारी आणि राज्यकर्त्यांचे संगनमत असल्याचा संशय निर्माण होतो," असा आरोप केला.



जालिंदर नागरगोजे (शेतकरी, वडगाव गुंधा) म्हणाले, "खते, औषधे, बियाण्यांचे दर कधीच कमी होत नाहीत. मग शेतमालाचे भावच वारंवार का कोसळतात, हे अजूनही न सुटलेले कोडे आहे."



- गोरख जामकर (शेतकरी, गुंधा वडगाव) म्हणाले, "उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा हमीभाव अत्यंत तुटपुंजा आहे. व्यापारी कवडीमोल दरात माल खरेदी करतात आणि शेतकरी कर्जाच्या डोंगराखाली दबला जातो."

दरम्यान, वाढत्या आर्थिक तणावामुळे काही शेतकरी टोकाची पावले उचलत असल्याची चिंताही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने खर्चाच्या तुलनेत योग्य हमीभाव, बाजारातील पारदर्शक व्यवस्था आणि शेतमाल खरेदीसाठी ठोस धोरण लागू करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# येळातांडा-इरला ग्रामस्थांतील पाईपलाईन वाद अखेर मिटला

## मोहनराव जगताप यांच्या मध्यस्थीने दोन्ही गावांतील शेतकऱ्यांत सलोखा





➤ माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील येळातांडा तालखेड आणि इरला येथील शेतकऱ्यांमध्ये पाईपलाईनच्या वापरावरून निर्माण झालेला वाद अखेर सामोपचाराने मिटला असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मोहनराव उर्फ मोहनदादा जगताप यांच्या मध्यस्थीने दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये सलोखा प्रस्थापित झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पाईपलाईनच्या वापर आणि पाण्याच्या वाटपाच्या मुद्द्यावरून दोन्ही गावांतील काही शेतकऱ्यांमध्ये मतभेद निर्माण झाले होते. या वादामुळे परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले होते. परिस्थिती चिघळू नये आणि गावांमधील ऐक्य अबाधित राहावे यासाठी मोहनदादा जगताप यांनी पुढाकार घेत दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांची बैठक आयोजित केली.

यावेळी त्यांनी दोन्ही गावांतील शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा करत शांततेच्या आणि समन्वयाच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले. गावातील सामाजिक ऐक्य आणि परस्पर सहकार्य टिकवून ठेवणे महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी संयमाची भूमिका घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीत दोन्ही गावांतील शेतकऱ्यांनीही सकारात्मक भूमिका घेत सर्वांच्या सहमतीने योग्य तो मार्ग स्वीकारला. भविष्यात अशा प्रश्नांवर वाद निर्माण न करता परस्पर संवादातून तोडगा काढण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या सामोपचारामुळे दोन्ही गावांतील वातावरण पुन्हा शांत आणि सलोख्याचे झाले आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● येळातांडा तालखेड आणि इरला गावांतील पाईपलाईन वाद मिटला

● मोहनदादा जगताप यांच्या मध्यस्थीने सामोपचाराचा मार्ग

● शेतकऱ्यांमध्ये संवादातून प्रश्नावर तोडगा

● तणावपूर्ण वातावरण निवळले; ग्रामस्थांमध्ये सलोखा

● भविष्यात एकोप्याने व सहकार्याने काम करण्याचा निर्धार

# पंढरीत अधिक मासानिमित्त 'अखंड हरिनाम सप्ताहा'चा भक्तीमय गजर

## ➤ महान संत भिमसिंह बाबा यांचे लाडके शिष्य श्रीराम महाराज शेळके यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन ➤ देशभरातील नामवंत किर्तनकारांची मांदियाळी

➤ पंढरपूर / प्रतिनिधी : श्रीक्षेत्र पंढरपूर येथे यंदाच्या अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासानिमित्त 'फिरता तीर्थक्षेत्र अखंड हरिनाम सप्ताह, श्री ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प.वै. महंत भगवान बाबा व ह.भ.प. महंत भिमसीह बाबा यांच्या आशीर्वादाने हा भव्य सोहळा मंगळवार दि. २६ मे २०२६ ते मंगळवार दि. ०२ जून २०२६ या कालावधीत पंढरपूर येथील गोविंदपुरा, म्हातार बाबा मठाशेजारी, अंबेगाव समाज धर्मशाळेत संपन्न होणार आहे. विसाव्या शतकातील महान संत भिमसिंह बाबा भगवानगड कर यांचे पट्ट्या शिष्य महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार असलेले श्रीराम महाराज शेळके मोरवडकर यांच्या सुंदर नियोजनातून हा सोहळा संपन्न होत आहे.

या सप्ताहाचे प्रमुख भागवताचार्य म्हणून श्री. ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके मोरवडकर हे श्रीमद् भागवत कथेचे निरुपण करणार आहेत. पहाटे ४ वाजता काकडा आरतीने प्रारंभ होऊन विष्णु सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, हरिपाठ व रात्री हरी किर्तन असे भरगच्च दैनिक कार्यक्रम होणार आहेत. या सोहळ्यात नाशिकचे ह.भ.प. माधव महाराज चव्हाण, पंढरपूरचे ह.भ.प. नामदेव महाराज लबडे, ह.भ.प. भगवान बाबा पात्रुडकर यांच्यासह महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांची सेवा लाभणार आहे. मंगळवार दि. ०२ जून रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन श्री. सटवा अण्णा कटारे, श्री. रमेश पटाईत, सुभाष काळे, ज्ञानेश्वर काटवडे, वैजनाथ गोरे यांनी केले असून अधिक माहितीसाठी मो. 9854245959 वर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक मासात पंढरीत ज्ञान, भक्ती व नामस्मरणाची मेजवानी भाविकांना मिळणार असल्याने परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

### प्रमुख किर्तनकार

● २६ मे : ह.भ.प. महंत प्रल्हाद महाराज, भिमलोह

२७ मे : ह.भ.प. श्रीराम महाराज विडेकर, शिवराम पुरीमठ

२८ मे : ह.भ.प. माधव महाराज चव्हाण, नाशिक

२९ मे : ह.भ.प. इंद्रजीत महाराज रसाळ

३० मे : ह.भ.प. भगवान बाबा पात्रुडकर

३१ मे : ह.भ.प. अशोक महाराज हकाळे, तांदळा

०१ जून : ह.भ.प. नामदेव महाराज लबडे, पंढरपुर

०२ जून : ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके - काल्याचे किर्तन

### परंपरेतील भागवताचार्य

● श्री. ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके मोरवडकर हे संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सांप्रदायिक परंपरेतील संत भिमसिंह बाबा यांचे पट्टशिष्य असून 'फिरता तीर्थक्षेत्र अखंड हरिनाम सप्ताहा'चे संस्थापक आहेत. गेल्या चाळीस वर्षांपासून श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी निरुपण व कीर्तन सेवेद्वारे वारकरी संप्रदायाचा प्रसार करीत आहेत. ओघवती वाणी व रसाळ कीर्तनशैलीमुळे महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेले महाराजांचे मुख्य केंद्र मोरवड, जि. बीड येथे असून अधिक मास, आषाढी व कार्तिकीला पंढरपुरात त्यांची विशेष सेवा असते.

**डॉ. गणेश ढवळे** ➤ ग्रामीण भागात लोंबकळणा-या तारांमुळे ग्रामस्थांचा जीव धोक्यात

# महावितरणची मान्सुनपूर्व दुरुस्ती व देखभाल मोहीम कागदावरच







➤ लिंबागणेश : प्रतिनिधी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून मान्सुनपूर्व दुरुस्ती आणि देखभाल मोहीम राबविण्यात येत असल्याचा दावा केला जात असला, तरी ग्रामीण भागात ही मोहीम प्रत्यक्षात केवळ कागदोपत्रीच सुरू असून महावितरणचा ढिसाळ कारभार सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

अनेक ठिकाणी लोंबकळणाऱ्या किंवा तुटलेल्या वीजतारांमुळे ग्रामस्थांचा जीव टांगणीला लागला आहे. रस्त्यावर किंवा घरांच्या अगदी जवळ आलेल्या वीजतारांमुळे निष्पाप नागरिकांचे बळी गेले असून, अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यांमुळे जीर्ण झालेल्या कमकुवत तारा रस्त्यावर पडून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. काही भागांत वीजतारा माणसांच्या उंचीपर्यंत खाली आल्याने लहान मुले व जनावरांना विजेचा धक्का लागण्याच्या घटनाही घडत असल्याची खंत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

महावितरणकडून पावसाळ्यापूर्वी तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी वीज खांब, ट्रान्सफॉर्मर व वीजतारा सुरक्षित ठेवणे, वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, जुने पीन व डिस्क इन्सुलेटर्स बदलणे, गंजलेले किंवा वाकलेले खांब बदलणे, उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, ऑईल फिल्टरेशन, वितरण बॉक्स दुरुस्त करणे तसेच उच्च व कमी दाबाच्या लाईन्सची देखभाल करणे आदी कामे केली जातात.

मात्र, अनेक ठिकाणी वीजतारांना लागून झाडांच्या फांद्या अद्यापही धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. मुसळधार पाऊस किंवा वादळाच्या वेळी या फांद्या वीजवाहिन्यांवर पडून मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ३० मेपूर्वी सर्व मान्सुनपूर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले असून कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

तरीदेखील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कामे होत नसल्याने वरिष्ठांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली जात असल्याची टीका डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. पावसाळ्यात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा टाळण्यासाठी तातडीने प्रभावी दुरुस्ती मोहीम राबवावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.